# दर्शन

Page No. Date

भगवान विष्णुंच्या चोवीस अवतारांतील कोणत्याही अवताराचे दर्शन आपल्यासारख्या क्षुद्र जीवांना दुर्लभच आहे. अवतारदर्शन तर सोडाच पण पापराशीमुळे त्यांच्या प्रतिमेचे नित्य दर्शन, नामस्मरण देखील होत नाही. असे असले तरी अनेक महान भक्तांना या भगवंतांच्या दोन, तीन अवतारांचे दर्शन घडले आहे. दत्त पुराणातील दोन उदाहरणे म्हणजे कार्तवीर्य आणि भक्त प्रल्हाद!

ह्या कार्तवीर्य सहस्रार्जुनाला गर्ग मुनींच्या मार्गदर्शनाने दत्त महाराजांचे दर्शन घडले. त्यांना ~~वरूना~~ वरदान मागतांना तो म्हणाला, माझ्यापेक्षा ख्यातीनी मोठ्या असणाऱ्याकडूनच मला मृत्यु यावा. या ठिकाणी "भक्तुल्य" हा शब्दप्रयोग दत्त महात्म्यात केला आहे. त्याप्रमाणे जमदग्नी मुनी आणि रेणुका मातेच्या पोटी भगवान विष्णुंनी (भार्गव) राम अवतार घेऊन, आणि त्यांनी कार्तवीर्याचा समरात वध केला. भगवान विष्णुचे हे दोन अवतार म्हणजेच दत्त महाराज आणि भगवान परशुराम, कार्तवीर्याला पाहता आले.

दुसरे उदाहरण म्हणजे भक्त प्रल्हादाचे! दत्त पुराणातील उपासना कांड म्हणजे दत्त महात्म्य! यात मात्र प्रल्हादाचे वर्णन गुण-संकीर्तन आले नाही. दत्त पुराणाच्या द्वितीय अष्टकातील सातव्या अध्यायात हा कथाभाग आहे. प्रल्हादाला श्रीविष्णूंच्या नरसिंहरूपाचे दर्शन झाले. हिरण्यकश्यपूच्या वधानंतर राज्यकारभार करत असला तरी प्रल्हादाचे मन कशातच लागत नव्हते. उदासपणे शिकारीच्या निमित्ताने रानावनातून हिंडतांना कावेरी नदीच्या काठी एकदा एका अवधूताला प्रल्हादाने पाहिले.

Page No.
Date

हे अवधूत जमिनीवर झोपलेल्या अवस्थेत, धुळीने माखलेले अंग, लोकांनी तिरस्कृत, वृद्ध, रागादी, मलरहित मात्र अत्यंत तेजस्वी असे होते. प्रल्हादाने आदराने वंदन करीत त्यांना म्हटले, हे मुने, उद्योगाने धन मिळते, धनाने भोग, भोगामुळे शरीर पुष्ट होते तर झोपून राहून, उद्योग न करता शरीर मात्र भोगी धनिकाप्रमाणे पुष्ट कसे? आपण विद्वान, व्यवहारदक्ष दिसता असे असून वृत्ती रागद्वेषादी शून्य कशी? (दत्तपुराण - दुसरे अष्टक, अध्याय ७-१०, १६)

यावर अवधूत रूपात असलेल्या दत्त महाराजांनी स्मितहास्य करीत प्रल्हादाला ज्ञान दिले अशी कथा आहे. थोडक्यात दत्त महाराजांच्या प्रत्येक दर्शनाचा भाग्ययोग नसला तरी या कथारूपात दर्शनयोग आहे हे अहोभाग्य!

सौ. उज्ज्वला श्रीराम प्रभुणे
स्टेट बँक कॉलनी
अमरावती

